**CNR No. MHSI01-000172016**

**नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. ३/२०१६ मधील नि. २७, ३२ व ३३ खालील सामाईक आदेश.**

**(सुरेंद्र मळगांवकर – पुनर्वादी वि. रुक्मीणी राऊळ व. – उत्तरवादी)**

.......

१. पुनर्वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नि . २७ हा उत्तरवादी क्र . ९ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करणेकरीता, अर्ज नि. ३२ हा उपशमितचा आदेश रद्द करणेकरीता, अर्ज नि. ३३ हा सदरहू उत्तरवादी क्र . ९ चे वारस अभिलेखावर घेणेकरीता परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जांचे अवलोकन केले व पुनर्वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. पुनर्वादींचे असे कथन आहे की, उत्तरवादी क्र. ९– सूर्यकांत नारायण राऊळ यांचा मृत्यू दि. १५/१०/२०१५ रोजी झाला. परंतु सदरहू उत्तरवादीचे मृत्यू प्रमाणपत्र उशिरा प्राप्त झाल्यामुळे, ते विहीत मुदतीत सदरहू उत्तरवादीचे वारस अभिलेखावर आणू शकले नाहीत. सदरचा विलंब क्षमापित व्हावा, अशी त्यांनी विनंती केली आहे . प्रस्तुत अर्जांस उत्तरवादी यांनी म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अभिलेखावरुन असे दिसून येते की, पुनर्वादी यांनी, सदरहू उत्तरवादीचे मृत्यू प्रमाणपत्र उशिरा प्राप्त झाले असे कारण अर्जात नमूद केलेले आहे , परंतु त्यांनी सदरहू उत्तरवादीचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केलेले नाही . सदरहू उत्तरवादीचे प्रस्तावित वारसांना नोटिसींची बजावणी झालेली आहे , परंतु ते प्रस्तुत अर्जाकामी हजर झाले नाहीत अथवा सदरहू उत्तरवादी मयत नाही किंवा ते त्यांचे वारस नाहीत , याबाबत म्हणणे दाखल करुन कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. जरी पुनर्वादी यांनी सदरहू उत्तरवादी क्र . ९ चे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले नाही व विलंबाचा कालावधी जरी दिर्घ असला तरी प्रस्तुतचा पुनर्वाद हा सन २०१६ चा म्हणजे जवळपास ७ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा असल्यामुळे, त्याचा लवकरात लवकर गुणदोषावर निर्णय होणे आवश्यक आहे व त्यामुळे न्यायहितार्थ पुनर्वादी यांना संधी देणे योग्य होणारे आहे . त्यामुळे सदरचे अर्ज मंजूर केल्यास उभयपक्षकारांचे कोणतेही नुकसान होणारे नाही , उलटपक्षी पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार करुन पुनर्वाद गुणवत्तेवर निर्णित होण्यास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहेत. उत्तरवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे. उपशमीतचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२. उत्तरवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत.

३. पुनर्वादी यांनी नियमानुसार विहीत मुदतीत आवश्यक पूर्तता करावी आणि पुनर्वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SANJAY JUGALKISHOR BHARUKA
Digitally signed by SANJAY JUGALKISHOR BHARUKA
Date: 2023.11.03 11:21:13 +0530

(सं. जु. भारुका)

दिनांकः– ०१/११/२०२३

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.